आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । बुधवार, ८ जून २०२२ । वर्ष : ४ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : ३० । पाने : ४ । मूल्य २ ₹

## आज बारावीचा निकाल!

पुणे : यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. आज बुधवार, दि.८ जून रोजी राज्यातील बारावीचा निकाल लागेल. राज्यातील सर्व विभागांचे दहावी आणि बारावी बोर्डाचे निकाल हे येत्या काही दिवसातच जाहीर होतील अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली होती. दरवर्षी प्रमाणे यंदाही बारावी बोर्डाचा निकाल हे सुमारे दुपारी एक वाजताच्या दरम्यान जाहीर होण्याची शक्यता आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# पालकमंत्र्यांचा 'सेल्फी विथ रोड'

▶ प्रतिनिधी



परळी वैजनाथ : परळी शहर बायपासचे काम पूर्णत्वाकडे पोहोचले असून याच मार्गावरून जात असताना सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी अचानक थांबून या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांना सेल्फीचा मोह आवरला नाही आणि त्यांनी रस्त्यासोबत सेल्फी काढला. धनंजय मुंडे यांचा हा 'सेल्फी विथ रोड' सोशल मीडिया चांगलाच व्हायरल होतोय. या सेल्फीच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी पंकजा मुंडेना डिवचण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

परळी शहरवासियांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा व अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या परळी शहर बायपासचे काम मंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून वेगाने पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहे. धनंजय मुंडे यांनी एका कार्यक्रमासाठी जात असताना, अचानक थांबुन या कामाची पाहणी केली. यावेळी काम अत्यंत वेगाने, दर्जात्मक पद्धतीने सुरू असल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. एवढेच नव्हे तर धनंजय मुंडे यांना आपण केलेल्या प्रयत्नांचे फलित पाहून, या रस्त्यावर उभारून सेल्फी घेण्याचा मोह आवरता आला नाही! आणि गाडीतून उतरून सेल्फी घेतला. परळी शहर बायपास हा दोन टप्प्यात विभागलेला असून, अवजड वाहतुकीच्या दृष्टीने हा बायपास अत्यंत महत्वाचा मानला जातो. पहिल्या टप्प्यात कन्हेरवाडी ते टोकवाडी या चार किलोमीटर लांबीच्या चार पदरी रस्त्याचे काम हाती घेण्यात आले असून, यासाठी ५४ कोटी रुपये निधी खर्च अपेक्षित आहे. यश कन्स्ट्रक्शन या कंपनी मार्फत या रस्त्याचे काम सुरू असून, रेल्वे ओव्हर ब्रिज वगळता सुमारे ८० टक्के काम पूर्णत्वाकडे आले आहे.

### एक टप्पा पूर्णत्वाकडे

मागील वर्षी ३ जुलै रोजी धनंजय मुंडे यांच्या हस्ते या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. तर दुसऱ्या टप्प्यात टोकवाडी ते संगम या रस्त्याचे सुमारे पावणे तीन किलोमीटरचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे. तर धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून परळी शहर बायपासचा एक टप्पा आता पूर्णत्वाकडे आला असून, यामुळे शहरातून होणाऱ्या अवजड वाहतूक व दळणवळण सुविधेत आमूलाग्र सकारात्मक परिणाम होणार आहे. मागील सरकारच्या काळात सुमारे ४ वेळा वेगवेगळ्या मंत्री महोदयांना परळीत बोलावून ४ भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करून सुद्धा तत्कालीन पालकमंत्र्यांना बायपासचे काम सुरू देखील करता आले नव्हते असा आरोप धनंजय मुंडे यांनी केला होता त्यामुळेच की काय, या कामाचे पूर्णत्वाकडे जात असलेले रूप पाहून धनंजय मुंडे यांना रस्त्यावर सेल्फी घ्यायचा मोह आवरला नसावा, अशीही जनसामान्यात चर्चा होत आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### शाळांमध्ये चिमुकल्यांचा किलबिलाट १५ जूनपासून

मुंबई : शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी राज्यातील शाळा सुरू होण्यासंदर्भात महत्त्वाची माहिती दिली आहे. १३ जूनला फक्त पहिलीच्या शाळांसाठी पहिले पाऊल हे कार्यक्रम होणार आहे. अन्य शाळा १५ जूनला सुरू होणार आहेत, असे गायकवाड यांनी सांगितले. वर्षा गायकवाड म्हणाल्या की, राज्यात सध्या मास्क कुठेही बंधनकारक नाही. त्यामुळे येणाऱ्या काळात परिस्थिती बघून शाळा संदर्भात निर्णय घेतला जाईल. मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोरोनाची नेमकी परिस्थिती कळेल. त्यानंतर शाळा सुरू करण्यापूर्वी चाइल्ड टास्क फोर्स असेल किंवा आरोग्य विभाग त्यांच्याशी आम्ही चर्चा करू आणि निर्णय घेऊ. महाराष्ट्र यंग लीडर्स एस्पीरेशन डेव्हलपमेंट प्रोग्राम आणि स्वजीवी प्रोग्राम या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

# मोठेवाडी सोसायटीवर मोहन जगताप यांचे वर्चस्व

▶ प्रतिनिधी



माजलगाव : तालुक्यातील मोठेवाडी, छोटेवाडी, रामनगर, हनुमाननगर येथील सेवा सहकारी सोसायटी भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात आली आहे. भारतीय पक्षाचे नेते तथा छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहनराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व १३ उमेदवार निवडून आले.

सध्या जिल्हाभरात सेवा सहकारी सोसायटी च्या निवडणुका सुरू आहेत. माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी, छोटेवाडी, रामनगर, हनुमाननगर ही सोसायटीची निवडणूक गुरूवारी पार पडली ही सोसायटी अत्यंत प्रतिष्ठेची समजली जात असल्याने संपूर्ण तालुक्याचे लक्ष या सोसायटीवर लागले होते. त्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे नेते मोहनराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पॅनलचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत. निवडून आलेले उमेदवार प्रभाकर पाष्टे, रामराव खेत्री, संभाजी चव्हाण, राजेभाऊ घोडके, भारत खेत्री, भगवान पवार, बाबुराव वराडे, जनार्धन गोंडे, श्रीकिशन कटके, भानुदास राठोड, तुकाराम इंगळे, संभाजी पौळ, दिगंबर राठोड या सर्वांचा मोहनराव जगताप यांनी भारतीय जनता पार्टी कार्यालय माजलगाव येथे शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. या सत्कार समारंभा वेळी सुरेशराव एरंडे, जगदीशराव बादाडे, उद्धवराव नागरगोजे सर, सरपंच अविनाश गोंडे, सरपंच अंगद कटके, संचालक विष्णुपंत खेत्री,माजी चेअरमन विश्वनाथ खेत्री, माजी चेअरमन विठ्ठलराव डांगे,उपसरपंच रोशन राठोड, प्रल्हाद दळवी, नगरसेवक शरद यादव, विनायक रत्नपारखी, नगरसेवक सय्यद कालू भाई, भास्करराव प्रधान, आनंत कुलकर्णी, विध्यासागर करपे उपस्थित होते.

### डॉ.भाग्यश्री पाटील यांचा सन्मान



पुणे : डी.पी.यु.च्या प्र.प्राचार्य डॉ.भाग्यश्री पाटील यांना 'लक्ष्मीबाई स्मृती पुरस्कार' भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते प्रदान करण्यात आल्या. त्याअनुषंगाने सन्मान करताना संपादक भगीरथ तोडकरी.



## संपादकीय

# मातृभाषेच्या संवर्धनासाठी...

जागतिक सिद्धांतानुसार मातृभाषेतून दिले जाणारे शिक्षण प्रभावी ठरते. ज्ञानभाषा म्हणून मातृभाषा संवर्धनासाठी पुढे आले पाहीजे. सामाजिक इच्छाशक्तीचा रेटा भाषेच्या मागे असल्याखेरीज कोणतीही भाषा प्रगतीची नवनवीन क्षितिजे गाठू शकत नाही. संत ज्ञानेश्वरांनी मराठीमध्ये अमृताशी देखील पैज जिंकण्याची ताकद आहे, ही जाणीव प्रबळ केली. संस्कृतमधील गीता मराठीतून जनसामान्यांपर्यंत पोहोचवली. आपल्या भाषेला बलशाली करण्याचा श्रेष्ठ आदर्श त्यांनी समाजासमोर उभा केला. मराठीच्या ठायी असलेली अभिव्यक्ती क्षमता योजून संतांनी समाजप्रबोधन केले. समाजमानसात विचार रुजवण्याकरता आपल्या भाषेइतके उपयुक्त साधन नाही, हे दाखवून दिले. यामागे होता मायभाषेवरचा ठाम विश्वास. १९९० नंतर बदललेल्या सर्व वातावरणात या विश्वासालाच तडा गेला. मध्यमवर्गाच्या संकुचित विचार चौकटीत आपल्या भाषेला जणू काही स्थान नव्हते. याचा पहिला घाव शिक्षणाच्या माध्यमावर पडला. सरसकट इंग्रजीकरणाने आपण साचेबंद पद्धतीने अख्ख्या पिढीला घडवत चाललो. मध्यमवर्गाचे अनुकरण तळागाळातल्या वर्गाने केले, तर नवल ते काय! भाषेबाबत उदासीन झालेल्या समाजाने शासनाला प्रश्न विचारण्याची ताकद गमावली त्यामुळे आसपास आपल्या भाषेला दुबळ्या करत असलेल्या गोष्टी घडत असताना समाज आवाज उठवत नाही, विरोध करत नाही. याचे ढळढळीत उदाहरण समोर दिसते ते असे मुंबई महानगरपालिकेने आज गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या नावाखाली सीबीएसई, आयसीएसई, केंब्रिज अशा अन्य बोर्डाच्या शाळा सुरू करण्याचा चंग बांधला आहे. महानगरपालिकेने नेमके काय करायला हवे? मराठी शाळांचे सक्षमीकरण करणे ही पालिकेची जबाबदारी आहे की इंग्रजी शाळांना फोफावायला रस्ता शोधून देणे ही त्यांची जबाबदारी आहे? नवी मुंबई महानगरपालिकेचे चित्रदेखील फारसे वेगळे नाही. नव्या मुंबईतही इंग्रजी शाळा वाढवण्याचा तेथील महानगरपालिकेचा कलही स्पष्टपणे दिसतो. कुंपणच जिथे शेत खाते तिथे तक्रारी घेऊन जायचे कुठे? स्वच्छ, दर्जेदार, गुणवत्तापूर्ण अशा मराठी शाळा निर्माण करणे ही शासनाची, प्रशासनाची जबाबदारी असल्याचे सांगणार कोण? ज्या समाजाने हे करायचे तोच मराठी शाळांची खिल्ली उडवतो, तर कधी कीव करतो. माझा एक मित्र एकदा म्हणाला, मराठीकरिता चळवळी वगैरे करून काहीही होणार नाही. शासनाने मराठीतून शिकलेल्या मुलांकरिता इंजिनीअरिंग, मेडिकल अशा क्षेत्रांमध्ये आरक्षण दिले पाहिजे. मराठीतून काही लाभ दिसला की, लोक मराठीकडे वळतील. त्याचे म्हणणे जरी मराठीकरिता पूरक असले तरी तरी या गोष्टी घडवण्याची जबाबदारी घ्यायची कुणी? शासनाचे फावते, कारण सामाजिक इच्छाशक्ती तोकडी पडते. मराठीकरिता शासन जी आश्वासने देत राहते, त्यातला पोकळपणा जरी लक्षात आला तरी समाजात आवाज उठवणाऱ्या लोकांची संख्या कमी असते. समाजातला जो बौद्धिक गुणविशेष असणारा वर्ग आहे, तो याकरता महत्त्वाचा, कारण हा वर्ग मराठीतून ज्ञानसंपदा निर्माण करू शकतो, मराठीला ज्ञानभाषा म्हणून बळकटी देऊ शकतो. पण अद्ययावत ज्ञान मराठीत आणण्याकरिता या वर्गाचे योगदान किती? उलट आपल्या समाजात इंग्रजीतच ज्ञान फिरत राहते, फिरत ठेवले जाते. मराठीचे ज्ञानभाषा म्हणून भरण पोषण करण्यात आमचा समाज कमी पडतो, हे तरी आपण मोकळेपणाने मान्य करायला हवे. ऑक्टोव्हिया पॉज यांनी एका मुलाखतीत जे म्हटले आहे, त्याचा संदर्भ इथे द्यावासा वाटतो. त्यांचे उद्गार असे आहेत की, मला सगळ्यात जास्त तक्रार इथल्या इंग्रजी शिकलेल्या वर्गाबद्दल आहे, जो एका बाजूला साहित्य व संस्कृतीचे नाटक करतो आणि दुसऱ्या बाजूला आपल्याच देशाच्या सांस्कृतिक आकांक्षा नष्ट करतो. भारतीयांनी हे ओळखणे गरजेचे आहे की, स्वत:ची भाषा आणि साहित्याच्या विकासाशिवाय ते आजही वेगळ्या अर्थाने गुलामीतच जगत आहेत. ही गुलामी आपल्या बहुतांश समाजाला कधी जाणवली आहे काय? परक्या भाषेची गुलामी आपल्याला पांगळे करते. हे पांगळेपण भयानक आहे. दुर्दैवाने या पांगळेपणातच सुख मानून जगायची सवय आपण लावून घेतली. आपली भाषा तिच्या अस्तित्वाकरिता झगडते आहे, लढते आहे आणि या संघर्षात तिच्यासोबत राहण्याची गरज आहे, हे जाणवेल तेव्हाच समाज मायभाषेच्या पाठीशी उभा राहील. मातृभाषेच्या संवर्धनासाठी शासनापेक्षाही प्रत्येकाने गांभीर्यपूर्वक विचार करण्याची गरज आहे.

# कोरोनाकाळात अब्जाधीशांना मात्र 'अच्छे दिन'

**'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या नुकत्याच झालेल्या वार्षिक बैठकीत ऑक्सफॅमचा एक अहवाल प्रकाशित करण्यात आलाय. 'प्रॉफिटिंग फ्रॉम पेन' नावाच्या या अहवालात कोरोना काळात लोक भूक, गरिबीमुळे आक्रोश करत असताना औषध, तेल, तंत्रज्ञान क्षेत्रातल्या ठराविक कंपन्यांनी भरमसाठ कमाई केलीय. त्यातून कोरोना काळात प्रत्येक ३० व्या मिनिटाला एका अब्जाधीशाचा जन्म झाला. या काळातली सरकारची धोरणं त्यांच्या फायद्याची ठरलीत.**



कोरोनामुळे जगभरातली अस्वस्थता वाढली. कोट्यवधी लोकांसाठी हा काळ जीवघेणा ठरला. योग्य वेळेत उपचार, औषधं, लस मिळावी म्हणून लोक धडपडत होते. त्याचवेळी दोन वेळचं जेवण मिळावं म्हणून लोकांना वणवण करावी लागत होती. ही वणवण सुरू असताना दुसरीकडे जगभरात नवे अब्जाधीश तयार होत होते. त्यांची संपत्तीही त्याच वेगाने वाढत असल्याचं 'ऑक्सफॅम इंटरनॅशनल' या संस्थेचा ताजा रिपोर्ट सांगतो.

२२ मे ते २६ मे दरम्यान स्वित्झर्लडच्या दावोस इथं 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'ची बैठक झाली. या बैठकीत हवामान बदल, कोरोनाचं संकट, रशिया-युक्रेनवर चर्चा झाली. जगभरातले प्रमुख पाहुणे नेते या बैठकीला उपस्थित होते. याचवेळी 'ऑक्सफॅम इंटरनॅशनल' या संस्थेचा 'प्रॉफिटिंग फ्रॉम पेन' नावानं एक रिपोर्ट प्रकाशित करण्यात आला होता.

३० मिनिटात एका अब्जाधीशाचा जन्म

ऑक्सफॅमच्या रिपोर्टनुसार, आज जगात २,६६८ अब्जाधीश आहेत. २०२०च्या तुलनेत ही संख्या ५६३नं वाढलीय. अब्जाधीशांची संपत्ती १२७ ट्रिलियन डॉलर इतकी आहे. कोरोना काळात त्यात ३.७८ ट्रिलियन डॉलरची वाढ झाली. ही संपत्ती १३.९ इतक्या जागतिक जीडीपीच्या बरोबरीची आहे. २००० हा आकडा ४.४ टक्के इतका होता. आताची वाढ ही तीन पटींची आहे.

गरीब आणि श्रीमंतांमधली ही दरी टोकाची आहे. जगातल्या १० सर्वात श्रीमंत लोकांची संपत्ती जगातल्या सगळ्यात गरीब ४० टक्के लोकसंख्येच्या म्हणजेच ३१० कोटी लोकांच्या संपत्तीपेक्षा जास्त आहे. गरीब वर्गातल्या एखाद्या व्यक्तीला श्रीमंत व्यक्तीइतकं उत्पन्न मिळवायचं तर ११२ वर्ष काम करावं लागेल.

कोरोना काळात प्रत्येक ३० मिनिटामधे एका अब्जाधीशाचा जन्म झाल्याचं ऑक्सफॅमचा रिपोर्ट सांगतो. दुसरीकडे यावर्षी ३३ मिनिटांमधे १० लाखच्या संख्येनं २६.३ कोटी लोकांना भयंकर गरिबीचा सामना करावा लागलाय.

किंमती वाढल्या, उद्योगपतींची संपत्तीही

मागच्या वर्षभरात अन्नधान्याच्या किमती ३० टक्क्यांनी वाढल्यात. दशकभरातली ही सर्वोच्च वाढ आहे. गेल्या दोन वर्षात याच कृषी क्षेत्राशी संबंधित ६२ नव्या अब्जाधींशांचा जन्म झालाय. अन्नधान्य आणि ऊर्जा क्षेत्रातल्या अब्जाधींशांच्या संपत्तीत मागच्या दोन वर्षात ४५,३०० मिलियन डॉलरची वाढ झालीय. याचा अर्थ त्यांच्या संपत्तीत प्रत्येक दोन दिवसात १०० मिलियन डॉलरपेक्षा अधिक फायदा झालाय.

कारगिल नावाच्या उद्योगपतींचं घराणं जगातल्या खाद्य व्यवसायाशी संबंधित आहे. कारगिल कंपनी इतर दोन कंपन्यांसोबत २०१७ला ७० टक्के जागतिक कृषी बाजारपेठ नियंत्रित करत होती. याच कंपनीने मागच्या दोन वर्षात रेकॉर्डब्रेक कमाई केलीय. कोरोनाच्या आधी या घराण्यातल्या उद्योगपतींची संख्या ८ होती. ही संख्या कोरोनानंतर १२ वर पोचली.

### आज-काल
### अक्षय शारदा शरद

अन्नधान्याच्या वाढत्या किमतींचा परिणाम हा आपल्या रोजच्या आयुष्यावर होत असतो. त्याचे सामाजिक आणि आर्थिक दुष्परिणामही दिसून येतात. एखाद्या वस्तूची किंमत १००ने वाढली असेल तर त्यातल्या ६० रुपयाला या कंपन्यांचा गडगंज फायदा कारणीभूत ठरल्याचं निरीक्षण या रिपोर्टमधे नोंदवलं गेलंय.

औषध कंपन्या फायद्यात

कोरोना काळात औषध क्षेत्रात नवे ४० अब्जाधीश जन्माला आले. मॉडर्ना, फायझरसारख्या कंपन्याही कोरोना काळात लसींचं उत्पादन घेत या क्षेत्रात मक्तेदारी मिळवली. या कंपन्या दर सेकंदाला १ हजार डॉलर कमावत होत्या. सामाजिक उत्तरदायित्वाच्या नावाखाली या कंपन्यांनी १० बिलियन डॉलरची मदत मिळवली.

जगभरातली सरकारं या लसी मूळ किमतीच्या २४ पट अधिक किमतीने विकत घेत होती. आजही जगातल्या गरीब देशांमधल्या ८७ टक्के लोकसंख्येचं लसीकरण झालेलं नाहीय. त्यामुळे बूस्टर डोसच्या नावाखाली या लसी बाजारात आणल्या गेल्या. पण त्याचा फायदा कितीशा गोरगरिबांना झाला? हा प्रश्न विचारायला हवाय. कारण या लसीच्या नावावर कोट्यवधी रुपये या कंपन्यांनी कमावलेत.

मास्क बनवणाऱ्या कंपन्याही या काळात तेजीत होत्या. ज्या कंपन्या महिन्याला १ लाख कमावत होत्या त्याच कोरोना काळात महिन्याला १० कोटींवर पोचल्या. इतर क्षेत्रांचा विचार करता तेल कंपन्या आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या गुगल, टेस्ला, ऍपल, मायक्रोसॉफ्ट, अल्फाबेट यांनी सर्वाधिक फायदा उठवलाय.

आर्थिक विषमता वाढली

संयुक्त राष्ट्राने नुकताच एक रिपोर्ट जाहीर केलाय. त्या रिपोर्टच्या अंदाजानुसार, जगातल्या ५३ देशांतले जवळपास १९३ मिलियन लोक तीव्र स्वरूपाच्या उपासमारीतून जातायत. कोरोनाच्या काळात कोट्यवधी लोकांना दोन वेळचं पुरेसं अन्न मिळालं नाही. पूर्व आफ्रिकन देशांमधे तर प्रत्येक मिनिटाला एक व्यक्ती भुकेने मरत होती. अनेकांचा रोजगार गेला. चांगलं राहणीमान, शिक्षण, आरोग्याच्या मूलभूत सुविधांसाठी लोकांना झगडावं लागत होतं. लोकांचा हा संघर्ष आजही चालू आहे.

दुसरीकडे जगातल्या अब्जाधीशांच्या संपत्तीत झपाट्याने वाढ झाली. कोरोना सारख्या अवघड काळातही अब्जाधीश व्यवस्थेचा फायदा उठवत होते. त्याला सरकारही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मदत करत होतं. जगभरातलं वाढतं खाजगीकरण या अब्जाधीशांच्या फायद्याचं ठरलं. त्यामुळे आर्थिक विषमता वाढली. ही विषमता कमी करायची असेल तर या अब्जाधीशांच्या संपत्तीवर कर लावायला हवा असं ऑक्सफॅमच्या रिपोर्टमधे म्हटलंय.

कोरोनामुळे जगभरात जवळपास ६३ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याचं जागतिक आरोग्य संघटनेची आकडेवारी सांगतेय. मोठ्या विकासाच्या गप्पा होत असताना हे वास्तव अस्वस्थ करणारं आहे. काही ठराविक लोकांची भरभराट आपलं भविष्य ठरवू शकत नाही. त्यामुळे ही विषमता दूर करून एक चांगलं भविष्य उभं करण्यासाठी सगळ्याच देशांची धडपड गरजेची आहे.

# गांभीर्य नसलेले काँग्रेसचे चिंतन

**चिंतन शिबिरात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पक्षाची जबाबदारी स्वीकारण्याबद्दल कोणतीही इच्छाशक्ती दाखवली नाही. दुसरीकडे, काँग्रेसने आपल्या विचारांवर असलेली धूळ साफ करण्याचा प्रयत्न केला; पण त्यातही स्पष्टता नव्हती. प्रादेशिक पक्षांवर राहुल गांधींनी केलेली टीका ही आजच्या वास्तवात अनाठायी होती. अशा सर्वांचा विचार करता चिंतन शिबिरातून हाती काय लागलं?' असा प्रश्न पडतो.**



उदयपूरचं चिंतन शिबिर' हे काँग्रेसने आणखी एक गमावलेली संधी म्हणून पाहता येईल. नेतृत्वाचा मुद्दा असो, सुधारणा असो, भावनिक मुद्द्यांवरची स्पष्टता असो किंवा सर्वात जुन्या पक्षात आधुनिकता आणण्याची तयारी असो. चिंतन शिबिरात या सर्व गोष्टींवर करण्यात आलेलं मंथन हे अर्धवट स्वरूपाचं राहिलं. यामधे काही निकषांचा समावेश केला गेला असला तरी विश्वासाचा अभाव दिसून आला.

बंडखोरांवर हायकमांडचा वरचष्मा

सर्वात महत्त्वाचं म्हणजे चिंतन शिबिरात जी-२३ म्हणजेच काँग्रेसच्या बंडखोर गटाचं मौन खटकणारं होतं. जी-२३ हा काँग्रेस नेतृत्वाशी असहमत असलेल्या नेत्यांचा गट असून, त्यात माजी केंद्रीय मंत्री आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी आणि उच्च पदांची आकांक्षा असणाऱ्या प्रतिष्ठित लोकांचा समावेश आहे.

आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस किंवा भाजपमधे आपलं भवितव्य शोधत असणाऱ्या काही नेत्यांचाही यात समावेश आहे. ज्यांना राज्यसभेची जागा हवी आहे किंवा २४, अकबर रोड इथं कार्यालय हवंय, असेही काही लोक आहेत. ऑगस्ट २०२०ला या बंडखोर गटाने स्वत:ची प्रतिमा सुधारणावादी आणि पुरोगामी, परिवर्तनशील असल्याची सादर केली. पण देशभरातून शिबिरात आलेले पक्षाचे ४३० नेते आणि प्रतिनिधी यांची उपस्थिती असताना त्यांनी चुपी साधली.

कपिल सिब्बल आले नव्हते. पण, १५ ऑगस्ट २०२०ला त्यांनी पक्षाला लिहिलेल्या पत्रातून खळबळ उडाली होती. त्यावर सह्या करणारे गुलाम नबी आझाद, आनंद शर्मा, मुकुल वासनिक, भूपिंदर सिंह हुड्डा, पृथ्वीराज चव्हाण, शशी थरूर, विवेक तनखा, मनीष तिवारी यांच्यासह आणखी काही सहभागी झाले होते. या सर्वांनी मौन राहणं पसंत केलं. यापैकी काही जण राज्यसभेवर जायला इच्छुक असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरू होती. म्हणूनच, कधी सुप्रसिद्ध आणि शिस्तप्रिय प्रतिमा असणाऱ्या; पण सध्या कमकुवत असणाऱ्या हायकमांडला बंडखोरांवर वरचष्मा गाजवणं सहजसुलभ होऊन गेलं.

काँग्रेसच्या अध्यक्षपदावर मौन

या चिंतन शिबिरात पक्षनेतृत्वाचा महत्त्वाचा मुद्दा हा अनुत्तरितच राहिला. शिबिरात काही नेत्यांनी सार्वजनिक रुपातून राहुल गांधी यांना अखिल भारतीय काँग्रेस समितीचे ८७ वे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्याची मागणी केली. विशेष म्हणजे आतापर्यंत जी मंडळी राहुल गांधी यांच्या नेतृत्वाला आणि त्यांच्या कामकाजाच्या पद्धतीला आक्षेप घेत होती, त्यापैकीच काही जणांनी राहुल यांना अध्यक्षपदी नेमण्याची मागणी केली, जेणेकरून गांधी कुटुंबातूनच याला विरोध होईल. पण असं काही घडलं नाही.

### राजकारण
### रशिद किडवई

राहुल गांधी यांनी मुळातच नेतृत्व सांभाळण्याबद्दल कोणतीही इच्छाशक्ती दाखवली नाही. शिबिरातली राहुल गांधी यांची देहबोली पाहून २०२४च्या लोकसभा निवडणुकीत ते काँग्रेसचं नेतृत्व करू इच्छित आहेत, असं वाटलं नाही. अर्थात काही नेत्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने सांगितलं, की राहुल गांधी अध्यक्ष होणं निश्चित आहे आणि हा मुद्दा अगोदरच निकाली निघाला आहे. पण असं काहीच दिसून आलं नाही.

राहुल गांधी यांची टिम पंचायतीपासून संसदेपर्यंत काम करते आणि त्याचं पक्षाच्या प्रत्येक पदावर आणि जागेवर नियंत्रण आहे. काँग्रेसच्या नव्या अध्यक्षाचा कार्यकाळ हा २०२२ ते २०२७पर्यंत असेल. त्यांच्या अंदाजानुसार गांधी कुटुंबाबाहेरची व्यक्ती काँग्रेसच्या अध्यक्षपदावर इतक्या काळ कार्यरत राहील का? प्रश्न असा, की तीन गांधी म्हणजेच सोनिया गांधी, राहुल आणि प्रियांका असताना गांधी कुटुंबाबाहेरचा एखादा नेता अध्यक्ष म्हणून स्वतंत्रपणे जबाबदारी सांभाळू शकेल का? या चिंतन शिबिरात याबाबतचं कोणतंही उत्तर मिळालं नाही.

महिला आरक्षणाचं भिजत घोंगडं

कोटे के भीतर कोटा' म्हणजेच महिला आरक्षण विधेयकाबद्दल पक्षाची सहमती ही केवळ प्रतिगामी नाही, तर काँग्रेसने काळानुसार विचार बदलल्याचं स्पष्ट झालंय. काँग्रेसने यापूर्वीच महिला आरक्षण विधेयकात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि आणि इतर महिलांसाठीच्या कोट्यासाठी सहमती दर्शवली असती, तर लोकसभा आणि विधानसभेत एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव राहिल्या असत्या.

२०१०ला काँग्रेस युपीए सरकारचं नेतृत्व करत होती आणि महिला आरक्षण विधेयक मांडलं होतं. पण मुलायम सिंह यादव, लालू प्रसाद यादव आणि शरद यादव यांनी विरोध केला. त्यांनी महिलांच्या ३३ टक्के आरक्षणात मुस्लिम, दलित आणि मागासवर्गीयातल्या महिलांना आरक्षण देण्याची मागणी केली. त्यामुळे काँग्रेसला हे विधेयक मंजूर करता आलं नाही.

मुलायम, लालू आणि शरद यादव यांसारख्या नेत्यांनी या विधेयकाचा फायदा केवळ उच्च जातीतल्या महिलांना झाला असता, असा दावा केला. परिणामी महिलांना प्रोत्साहन न दिल्यामुळे संसदेत महिला खासदारांना स्थान देण्याच्या बाबतीत भारताचा १९३ देशांच्या यादीत १४८ वा क्रमांक आहे.

राजकारणाला धर्माशी जोडण्याचा प्रयत्न

चिंतन शिबिरात काँग्रेस नेत्यांनी संघटनेला नवीन रूप देण्याच्या जुन्या प्रस्तावावर विचार केला. त्यात ब्लॉक, मंडळ, शहर आणि जिल्हा पातळीवरच्या काँग्रेस समिती भंग करून त्यांच्या जागी पोलिंग बूथ तसंच लोकसभा आणि विधानसभा क्षेत्रातल्या समिती नियुक्त करण्याचा मुद्दा मांडण्यात आला. पण काही नेत्यांनी त्याला विरोध केला. यामुळे काँग्रेसची प्रतिमा ही सामाजिक बदल घडवून आणणं आणि पायाभूत पातळीवर काम करणाऱ्या पक्षाऐवजी निवडणुकीचं मशिन म्हणून समोर येईल, अशी भीती वर्तवली गेली.

चिंतन शिबिरात काँग्रेसने आपल्या विचारांवर असलेली धूळ साफ करण्याचा प्रयत्न केला; पण त्यात स्पष्टता नव्हती. धर्माला प्राधान्य देणं तसंच धर्मनिरपेक्ष यांसारख्या शब्दांवर जोरात चर्चा झाली. त्यात उत्तर आणि दक्षिण भारतात झालेलं विभाजन पाहायला मिळालं.

कमलनाथ आणि भूपेश बघेलसह उत्तर प्रदेशातल्या काही नेत्यांनी धर्माशी निगडित कार्यक्रम सुरू करण्याची मागणी केली. या काँग्रेस नेत्यांनी दही हंडी स्पर्धा आयोजित करणं, जिल्हा आणि प्रदेश समिती कार्यालयात गणेशोत्सव साजरा करणं आणि स्थानिक पातळीवर नवरात्र साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. पण कार्यसमितीचे सदस्य बी. के. हरिप्रसाद, डॉ. चिंता मोहन याशिवाय दक्षिण भारतातल्या इतर नेत्यांनी यास विरोध केला. राजकारणाला धर्माशी जोडण्याचा अर्थ हा भाजपच्या खेळपट्टीवर जाण्यासारखे होईल, अशी भूमिका त्यांनी मांडली.

मे २०१४ नंतर विचारसरणीच्या आघाडीवर काँग्रेसमधली द्विधा मन:स्थिती अधिक प्रकर्षाने समोर आली. यादरम्यान पक्षाचं नेतृत्व करणाऱ्या सोनिया आणि राहुल गांधी यांनी वैचारिक क्षमता दाखवण्याऐवजी याकडे कानाडोळा केला. उलट डिसेंबर २०१७ ते मे २०१९पर्यंत काँग्रेस अध्यक्ष या नात्याने राहुल गांधी मंदिरात जात होते. तसंच इफ्तारमधे सहभागी होत होते. अशा स्थितीत उदयपूर इथल्या चिंतन शिबिरातला धार्मिक कार्यक्रमाशी निगडित नव्याने आलेला प्रस्ताव समजण्यायोग्य आहे.

वास्तवाचं भान नसलेलं चिंतन

या शिबिरातून समोर आलेला आणखी एक मुद्दा म्हणजे राहुल गांधी यांनी प्रादेशिक पक्षांबद्दल केलेलं विधान. प्रादेशिक पक्षांना कोणतीही विचारधारा नसते, हे विधान किंवा टीका त्यांच्याजागी योग्य असेलही; पण बिगर एनडीए पक्षांवर टीका करणं सध्याच्या स्थितीत काँग्रेसने टाळलं पाहिजे. कारण त्यांच्यासोबत आघाडी करणं ही काँग्रेसची अपरिहार्यता आहे.

आगामी लोकसभा निवडणुकांचा विचार केल्यास, आज अशी स्थिती आहे, की काँग्रेसशिवाय आघाडी उभी राहू शकत नाही आणि प्रादेशिक पक्षांना सोबत घेतल्याशिवाय काँग्रेस भाजपला आव्हान देऊ शकत नाही. पदयात्रा काढून जनसंपर्क वाढवण्याचा विचार योग्य असला तरी काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतचं अंतर पार करण्यासाठी दीड ते दोन वर्षाचा कालावधी लागू शकतो. कारण सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका गांधी हे काही अंतर चालून नंतर झेंडा दाखवून बसगाड्या रवाना करत असतील, तर त्याचा फायदा होणार नाही.


वर्तमान
छत्रपतींच्या विचारांची नवी पिढी घडवा
एसटी कर्मचारी संपाची तलवार म्यान
कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कामगार संघटनेची घोषणा
'इंडियन स्पाईसी' लौकिकास पात्र ठरेल : आठवले
सायरस पुनावाला यांना भारतरत्न किताब द्या

# मायबाप वाचकहो..!

'गाव तिथं वर्तमान' मोहिमे अंतर्गत आमच्या वाचकांना नवं, आकर्षक पॅकेज देण्याचा आमचा मानस आहे. त्यादृष्टीने वर्षभर घरपोच अंक मिळविण्यासाठी केवळ ४९९₹ भरा. अंकासोबतच तुमच्या कुटुंबातील लाडक्या व्यक्तीचा वाढदिवस अधिक द्विगुणीत करण्यासाठी ठराविक आकारातील जाहिरात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल. त्यासाठी वर्तमान तर्फे मोफत जाहीरात कूपन देण्यात येणार आहे. तरी आपण कसलीच संधी न दवडता आमच्या 'गाव तिथं वर्तमान' मोहिमेत सहभागी होण्यासाठी संपर्क साधावा.




## संधी दवडू नका,
## सहभागी व्हा!

आधुनिक विचारांचे
**वर्तमान**
आपले वृत्तपत्र, आपला आवाज

कॉर्पोरेट ऑफीस : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड (महाराष्ट्र) ४३११३१
vartmaneditor@gmail.com | 9423209823
www.vartmannews.in | 7499934141

# लोकनेते गोपीनाथ मुंडे सर्व घटकांचे प्रेरणास्थान

## मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे उद्गार





प्रतिनिधी

परळी वैजनाथ : गोपीनाथगडावर आठव्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित समारंभास मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे हे अविरत संघर्ष, साहस आणि वंचित घटकांची सेवा यांचा त्रिवेणी संगम आहे. त्यांच्या या कार्याचा वारसा आपण सर्वांनी मिळून पुढे घेऊन जाऊया असे चौहान म्हणाले.

गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीस्थळी सुरूवातीला पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर संघर्ष सन्मान म्हणून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा संघर्षदिन सन्मान करण्यात आला आहे. यामध्ये उद्योगपती पद्मश्री मिलिंद कांबळे, गोरक्षक पद्मश्री सय्यद शब्बीर, मुंबईच्या सामाजिक कार्यकर्त्या प्रिती पाटकर, ललिता वाघ यांचा गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी बोलताना ते म्हणाले की, मी आज गोपीनाथगडावर एक भाजपाचा नेता किंवा मध्य प्रदेशचा मुख्यमंत्री म्हणून नाही, तर दिवंगत मुंडे यांचा भाऊ म्हणून उपस्थित राहत आहे. भाजपाचे मजबूत संघटन आज देशभरात दिसून येते या संघटनाला महाराष्ट्रात गावागावापर्यंत पोहचवण्याचे कार्य दिवंगत प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे या दोघांनी केले. मध्यप्रदेशमध्ये काम करताना सर्वप्रथम प्रमोद महाजन यांनीच आपल्याला अध्यक्ष म्हणून पक्षात संधी दिली आणि मुंडे-महाजन यांच्यासोबत काम करण्याची संधी मला मिळाली. अगदी जवळून यांचे काम काम पाहिले आहे.

'मुंडे जनसामान्यांचे अद्वितीय नेतृत्व'

दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांनी भाजपाला गावोगावी पोहोचविले. मी थकणार नाही, थांबणार नाही, कोणासमोर झुकणार नाही, असे मनाशी ध्येय ठेवून अहोरात्र मेहनत घेतली. राज्यात संघर्ष यात्राद्वारे काँग्रेसला सत्तेवरून पायउतार करण्यास भाग पाडले. सामान्य कुटुंबातील ऊसतोड मजुरांचे प्रश्न सोडविले. मुंडे हे कायम जनतेसाठी जगले ते नवा इतिहास रचून गेले. त्यांना मी कधीही विसरणार नसल्याची भावना चौहान यांनी व्यक्त केली.

### सामाजिक न्याय मंत्री समाधीस्थळी नतमस्तक

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या आठव्या स्मृतिदिनानिमित्त बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी गोपीनाथगडावर जाऊन मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेतले. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.





# बीड जिल्ह्यातील वाढते दलित अत्याचार चिंताजनक

## भीम आर्मी प्रमुखांकडे सिध्दार्थ मायंदळे यांची कैफियत

प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यामध्ये दलितांवरील अत्याचार वाढले आहेत. यावर कारवाई करण्यास पोलीस प्रशासन कमी पडत आहे. त्यामुळे अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. हे आटोक्यात आणले नाही तर भिम आर्मी स्टाईलने उत्तर देऊ असा इशारा भीम आर्मीचे जिल्हाप्रमुख सिध्दार्थ मायंदळे यांनी प्रसिध्दीमाध्यमामार्फत दिला आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातील वाढते दलित अत्याचार चिंताजनक असून याकडे शासनाने डोळेझाक करू नये, अशी मागणी जिल्हाप्रमुख मायंदळे यांनी केली आहे.

जातीय मानसिकतेतून हे अत्याचार होत आहेत. आरोपी यांच्यावर कठोर करवाई होत नसल्यामुळे अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. परवा कोथिंबीरवाडी ता. धारूर इथे जातीय मानसिकतेतून महिला, लेकरा-बाळासह दलित कुटुंबावर हल्ला करून मारहाण केली. आणि याची चित्रफित पाहून त्या महिलेचा आक्रोश पाहून कोणाचेही हृदय पिळवटून जाईल. एवढे अमानुष अत्याचार जातीवादी लोकांनी केला. ही घटना महाराष्ट्राला काळीमा फासणारी आहे. त्या सर्व आरोपींवर कठोर कारवाई करावी. अशीही मागणी त्यांनी केली आहे.

### पोटनिवडणुकीत संकेत ढगे विजयी



पात्रुड : येथील ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीत संकेत धैर्यशील ढगे ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आले आहेत.



# पर्यावरणीय समतोल राखण्याची गरज

## उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांचे आवाहन


प्रतिनिधी

माजलगाव : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रविवार, दि.५ जून रोजी माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयामध्ये महसूल प्रशासन आणि सामाजिक वनीकरण विभाग बीड यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये विविध प्रकारच्या ११ झाडांच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसिलदार वर्षा मनाळे, वनरक्षक डी.बी.शेळके, उपविभागीय अधिकारी कार्यालयातील व वन विभागातील अधिकारी, कर्मचारी हे उपस्थित होते.

शाश्वत विकासासाठी पर्यावरणाचा समतोल साधणे अत्यंत आवश्यक असून, ती काळाची गरज तर आहेच परंतु, सर्वांचे नैतिक कर्तव्यही आहे. त्यामुळे सर्व माजलगाव वासियांनी येणाऱ्या पावसाळ्यात किमान एक तरी रोपाचे वृक्षारोपण करून, लावलेल्या रोपांचे योग्य रीतीने संगोपन करावे जेणेकरून भविष्यात पर्यावरणातील चांगला बदल आपल्याला पहावयास मिळेल व पर्यावरणाचा ऱ्हास थांबेल. असे आवाहन जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांच्यावतीने करण्यात आले. पुढे बोलतांना बाफना म्हणाल्या की, येणाऱ्या काळात चांगला पाऊस झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या आवारातील १० गुंठा जागेत जवळपास ३००० झाडांची वृक्ष लागवड करून घन वन करण्याची योजना आहे व या वृक्ष लागवडीचा संकल्प घेत कार्यक्रमाचा समारोप झाला.

# ॲड.मोगरेकर यांचे निधन

प्रतिनिधी



माजलगाव : शहरातील सन्मित्र कॉलनी भागातील रहिवाशी असलेले जेष्ठ विधिज्ञ ॲड.अनिल मनोहरराव मोगरेकर (वय ७७ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने रविवारी दि. ५ पहाटे निधन झाले.

ॲड.अनिल मोगरेकर हे नवविकास मंडळाचे सहकार्यवाह तथा आदर्श वाचनालयाचे प्रमुख तसेच महात्मा फुले विद्यालय शालेय समिती अध्यक्ष, लवुळ येथे शिक्षक म्हणून देखिल काम केलेले असल्याने ते सर्वपरिचीत होते. शेतीवर त्यांची आस्था होती. रविवारी पहाटे त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सिंदफणा काठी असलेल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अभियंता शंतनु मोगरेकर यांचे ते वडील होत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा लोकाभिमुख राज्यकारभार : खांडेकर

प्रतिनिधी

सिरसाळा : आदर्श राज्यकारभार कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून होळकरशाहीकडे पाहिले जाते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या अष्ठावधानी राज्यकर्त्या तर होत्याच पण त्यांचा राज्यकारभार हा लोकाभिमुख असल्याचे प्रतिपादन बंडूजी खांडेकर यांनी केले. धारुर तालुक्यातील कुंडी येथील अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जयंती कार्यक्रमात ते बोलत होते.

जेष्ठ नेते माऊली गडदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात बंडू खांडेकर यांचे प्रमुख मार्गदर्शन झाले. यावेळी युवानेते सतीश काळे, चंद्रकांत देवकते, कपिल गाडेकर, विजय धायगुडे, अमोल काचगुंडे, धनराज बिडगर, एन.के.आप्पा, श्यामसुंदर मुंडे, आदी मान्यवरांनी लोकमातेच्या कार्यावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन प्रा.बापूराव काळे यांनी तर प्रास्ताविक गणेश देवकते यांनी केले. सायंकाळी गावातून अहिल्यामातेच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली.



आपल्या भाषणात खांडेकर पुढे म्हणाले की, आदर्श राज्यकारभार कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून अहिल्यादेवी यांच्या स्वच्छ व पारदर्शक प्रशासनाचा दाखला जगभरात दिला जातो. जागतिक विचारवंत व इतिहास संशोधकांनी सुद्धा होळकरांच्या कारकिर्दीचे तोंडभरून कौतुक केलेले आहे. तेंव्हा आजच्या दिशाहीन राज्यकर्त्यांनी होळकशाहीचा अभ्यास करावा व त्यातून लोकाभिमुख राज्यकारभार कसा करावा याची प्रेरणा घ्यावी असा सल्लाही बंडू खांडेकर यांनी दिला. अध्यक्षीय भाषणात माऊली गडदे यांनी प्रतिकूल परिस्थितीतही अहिल्यादेवी यांनी न डगमगता प्रजेसाठी केलेल्या कार्यातून महिलांनी प्रेरणा घ्यावी असे मत मांडले. तसेच शस्त्र आणि शास्त्र यांची सांगड घालून राजमातेने केलेल्या उत्तुंग कार्याच्या खुणा देशभर पाहायला मिळतात असेही सांगितले. जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी समितीचे अध्यक्ष मिट्टू काळे, उपाध्यक्ष गणेश काळे, सुधीरराव जायभाये, उपसरपंच मारोती काळे, संतोष अहिरे, हरीचंद्र जायभाये, किसनराव काळे, दिनेश खाडे, बापू काळे, गणेश काळे, अशोक रामचंद्र काळे, अमोल कांगने, प्रदीप काळे, भागवत काळे, 'अक्षय काळे, मदन काळे आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# धावपटू साक्षी दाभेकरला मिळाले नवे बळ

## मंत्री एकनाथ शिंदे यांनी पाळला शब्द; कृत्रिम पाय बसविला

प्रतिनिधी

मुंबई : पूरग्रस्त केवनाळे ता.पोलादपूर दुर्घटनेत एक पाय गमावलेल्या साक्षीला डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनकडून अत्याधुनिक कृत्रिम पाय बसविण्यात आला. दरम्यान, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द पाळला असून डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या वतीने अत्याधुनिक कृत्रिम पायासाठी पूर्ण खर्च उचलण्यात आला आहे. शिंदे यांच्या सामाजिक बांधिलकीबद्दल राज्यभरातून कौतुक होत आहे.

गेल्यावर्षी दुर्घटनेनंतर साक्षीला मुंबईतील केईएम रूग्णालयात साक्षीवर उपचार करण्यात आले. यावेळी रूग्णालयात समक्ष भेट देऊन मंत्री एकनाथ शिंदे यांनी साक्षीच्या उपचारासाठी पाच लक्ष रूपयांची थेट आर्थिक मदत केली होती. यावेळी शिंदे यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानवर आधारित कृत्रिम पाय बसविण्याच्या डॉक्टरांना सूचना दिल्या होत्या.त्यानुसार एकनाथ शिंदे यांच्या हस्ते साक्षी दाभेकर हिला अत्याधुनिक कृत्रिम पाय बसविण्यात आला. यावेळी साक्षीच्या चेहऱ्यावर एकच स्मित हास्य उमटले. डॉ.अंकुश सेठ यांच्या टीमने शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या आणि डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून अत्याधुनिक कृत्रिम पाय साक्षीला बसविण्यात आला. २ वर्षाच्या बाळाला वाचविण्याऱ्या साक्षीच्या धाडसी कामगिरी अतुलनीय; राष्ट्रपती बाल शोर्य पुरस्कारासाठी दिल्लीत पाठपुरावा खासदार डॉ.श्रीकांत शिंदे करणार आहेत.



### साक्षीचे धाडसी कार्य

पूरस्थितीत पोलादपूर तालुक्यातील केवनाळे गावात एका दोन महिन्याच्या मुलाला वाचवताना भिंत अंगावर कोसळून साक्षी दाभेकर (वय १४) ही क्रीडापटू जबर जखमी झाली होती. तिला तातडीने मुंबईत हलवण्यात आले. 'केईएम'मध्ये डाव्या पायावर शस्त्रक्रिया करून पाय गुडघ्यापासून खाली कापावा लागला होता. या मुलीची घरची आर्थिक स्थिती अत्यंत बेताची असल्याने पुढील उपचाराच्या लाखो रुपयांच्या खर्चाचा प्रश्न उभा राहिला होता. त्याअनुसरून नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून हि जबाबदारी उचलली. साक्षीचे ऑलम्पिकमध्ये धावण्याचे स्वप्न असून या स्वप्नपूर्तीसाठी डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.